INDIAN COUNCIL OF MEDICAL RESEARCH
Serving the nation since 1911
NIIH
NATIONAL INSTITUTE OF IMMUNOHAEMATOLOGY
आईसीएमआर- हीमोग्लोबिनोपॅथी संशोधन व्यवस्थापन आणि नियंत्रण केंद्र
(आईसीएमआर- राष्ट्रीय प्रतिरक्षा रुधिर विज्ञान संस्थान)
मौजा खुटाळा, प्लॉट नं. ९५/१, सर्व्हे नं. ९५/१ & ९२,
चंद्रपूर - ४४२ ४०६ महाराष्ट्र दूरध्वनी : ०७१७२-२६३२३१

# साधे प्रश्न सोपी उत्तरे (सिकल सेल बाबत)

**प्रश्न १ : सिकलसेल आजार कसा होतो ?**
उत्तर : सिकलसेल आजार हा अनुवांशिक असून फक्त आई आणि वडिलांकडून अपत्यास होतो.

**प्रश्न २ : सिकलसेल बाधित (SS) व्यक्तीशी लग्न केल्यास किंवा शारिरीक संबंधातून सिकलसेल होतो का ?**
उत्तर : नाही , सिकलसेल आजार हा केवळ सिकलसेल वाहक किंवा सिकलसेल बाधीत आई वडिलांकडूनच मुलांना होतो.

**प्रश्न ३ : पुर्वजांनी जनावरांचे मांस खाण्यामुळे सिकलसेल प्रसार झाला का ?**
उत्तर : नाही, याबाबत कोणतेही संशोधन उपलब्ध् नाही त्यामुळे वरील विधान अयोग्य आहे.

**प्रश्न ४ : सिकलसेल आजार हा ठरावीक जाती समुहांच्याच लोकांना असतो का ?**
उत्तर : नाही, सिकलसेल आजाराचे प्रमाण बहुतांश भारतीय जाती समुहांमध्ये कमी अधीक असु शकते, केवळ ठरावीक जातिंमध्येच आहे असे म्हणणे चुकीचे होईल

**प्रश्न ५ : देवाच्या कोपाने किंवा मांत्रीकाने जादू केल्यास सिकलसेल आजार होतो का ?**
उत्तर : नाही, सिकलसेल हा अनुवांशीक आजार असल्याने देवाचा कोप किंवा मांत्रीकांच्या जादूने होत नाही.

**प्रश्न ६ : आयुर्वेदिक (झाडपाल्याच्या) औषधाने सिकलसेल आजार पुर्णत: बरा होतो का ?**
उत्तर : नाही, आयुर्वेदिक किंवा ईतर कोणत्याही औषधाने सिकलसेल आजार पुर्णत: बरा होत नाही तर योग्य औषधोपचाराने नियंत्रणात ठेवता येतो.( फक्त अस्थिमज्ज्ञा प्रत्यारोपण शस्त्रक्रिया केल्याने सिकलसेल आजार पुर्ण बरा करता येऊ शकतो).

**प्रश्न ७ : आई वडिल निरोगी असतांना सुद्धा त्यांच्या अपत्त्यांना सिकलसेल आजार होतो का ?**
उत्तर : नाही, निरोगी पालकांचे अपत्य सिकलसेल बाधित किंवा सिकलसेल वाहक होऊ शकत नाही.

**प्रश्न ८ : सिकलसेल बाधित व्यक्तिंचा लवकर मृत्यु होतो का ?**
उत्तर : नाही. सिकलसेल बाधित व्यक्तींनी योग्य व नियमित औषधोपचार घेतल्यास सरासरी निरोगी व्यक्ती एवढेच आयुष्य जगता येते. केवळ योग्य औषधोपचार न घेणे आणि आरोग्या बाबत निष्काळजी पणा केल्याने आजाराची तिव्रता वाढून मृत्यु होऊ शकतो.

**प्रश्न ९ : सिकलसेल आजार हा वयाच्या कोणत्या वर्षी होतो ?**
उत्तर : सिकलसेल आजार हा जन्मता:च असतो.

**प्रश्न १० : सिकलसेल आजाराची तपासणी कुठे होते ?**
उत्तर : सर्व सरकारी रुग्णालये व हिमोग्लोबिनोपॅथी संशोधन व्यवस्थापन आणि नियंत्रण केंद्र येथे.

**प्रश्न ११ : सिकलसेल आजारासंदर्भात उपचार कोठे होतात.**
उत्तर : हिमोग्लोबिनोपॅथी संशोधन व्यवस्थापन आणि नियंत्रण केंद्र, चंद्रपूर, जिल्हा सामान्य रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व डे केअर सेंटर मध्ये मोफत उपचार होतो. सोबतच अस्थिमज्ज्ञा प्रत्यारोपण शस्त्रक्रीया महाराष्ट्रात खालील रुग्णालयात उपलब्ध आहे.
१) लोकमान्य टिळक रुग्णालय, बोरीवली ईस्ट, मुंबई
२) कोकीलाबेन रुग्णालय, अंधेरी वेस्ट, मुंबई

**प्रश्न १२ : सिकलसेल बाधित व्यक्तींनी लग्न करावे का ?**
लग्न करणे न करणे हा पुर्णता: बाधित व्यक्तिंचा खाजगी विषय आहे पण, खालिल विधाने लक्षात घेऊन विवाह करावा.
सिकलसेल बाधित (SS) व्यक्तीने सिकलसेल बाधीत (SS) व्यक्तिंशी विवाह करु नये.
सिकलसेल बाधीत (SS) व्यक्तिंनी सिकलसेल वाहक (AS) व्यक्तींशी विवाह करु नये.
सिकलसेल वाहक (AS) व्यक्तिंनी सिकलसेल वाहक (AS) व्यक्तींशी विवाह करणे टाळावे.
सिकलसेल बाधित (SS) व्यक्ती पुर्णत: निरोगी व्यक्तींशी विवाह करु शकतात.
सिकलसेल वाहक (AS) व्यक्ती पुर्णत: निरोगी व्यक्तींशी विवाह करु शकतात.

**प्रश्न १३ : जर पती पत्नी सिकल सेल वाहक किंवा बाधित असतील तर काय करावे लागेल ?**
उत्तर : पती पत्नी जर सिकल सेल वाहक असतील तर गर्भातच अर्भकाची गर्भजल तपासणी करणे आवश्यक आहे. (११ ते १३ आठवडे सी. व्ही. एस. १५ ते १७ आठवडे एम्नियोसेंथेसिस किंवा १८ ते २१ आठवडे कॉर्डोसेंथेसिस करता येते.

**प्रश्न १४ : सरकारकडून कोणकोणत्या सोईसुविधा मिळतात.**
उत्तर : अ) सर्व सरकारी/निमसरकारी रुग्णालयात मोफत उपचार
ब) राज्य रक्त संक्रमण परिषदेचे ओळखपत्र (मोफत रक्त संक्रमण)
क) दिव्यांग प्रमाणपत्र व त्याचे लाभ
ड) जोखमी (आई-वडील) गर्भवती माता गर्भजल तपासणी सुविधा
इ) राज्यशासनाकडून संजय गांधी निराधार अनुदान योजना मधून दरमहा एक हजार (रु. १०००) लाभ मिळतो.
ई) जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे सिकलसेल प्रमाणपत्र.
फ) सिकलसेल बाधीत व्यक्तीला उपचारा संबंधी प्रवास करावयाचा असल्यास एस. टी. महामंडळ तर्फे प्रवास भाड्यात ७५% सवलत.